प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO
सिडको
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. 1 ऑगस्ट 2018**

**सिडको अर्बन हाट येथे 2 ते 19 ऑगस्ट या कालावधीत "श्रावण मेळा 2018" चे आयोजन**

भारतीय संस्कृतीत श्रावण मास हा मांगल्याचा आणि सण-उत्सवांचा महिना म्हणून ओळखला जातो. सणावारांची रेलचेल असलेल्या या महिन्यापासून पुढे वर्षभर विविध सण साजरे केले जातात. म्हणून श्रावण मासाचे औचित्य साधत सिडको अर्बन हाट येथील महोत्सवांस प्रारंभ होतो. यावर्षीही सिडकोतर्फे अर्बन हाट येथे ऑगस्ट 2018 ते जून 2019 या 270 दिवसांच्या कालावधीत अशाप्रकारचे 20 सांस्कृतिक कार्यक्रम/महोत्सव नियोजित आहेत. या कार्यक्रमांमध्ये देशातील 40 हून अधिक राज्यांतील 1,000 पेक्षा अधिक कारागीर/कलाकार आपला सहभाग नोंदवतील. **दि. 2 ऑगस्ट ते 19 ऑगस्ट 2018** या कालावधीत **सकाळी 11.00 ते रात्री 10.00** या वेळेत **अर्बन हाट** येथे **श्रावण मेळयाचे** आयोजन करण्यात आले आहे. श्रावण मेळयानंतर पुढे वर्षभर नियोजित वेळापत्रकाप्रमाणे अन्य कार्यक्रम पार पडतील.

श्रावण मेळयात महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, बिहार, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, ओडिशा आणि पंजाब या राज्यांतील कलाकार/कारागीर सहभागी होतील. याशिवाय विविध राज्यांतील कुशल कारागिरांनी निर्मिलेली हातमाग व हस्तकला उत्पादने या वेळी प्रदर्शनार्थ मांडली जातील. ज्यांना या कार्यक्रमासाठी स्टॉल बुक करायचे असतील त्यांनी अधिक माहितीसाठी **व्यवस्थापक**, **अर्बन हाट** यांच्याशी **9594521169** या क्रमांकावर संपर्क साधावा.

कलाकुसर केलेल्या उत्पादनांशिवाय या महोत्सवात दक्षिण भारतीय, राजस्थानी व कोल्हापुरी खाद्यपदार्थ, दिल्ली चाट यांचा आस्वादही घेता येईल. तसेच विविध प्रकारचे मसाले, पापड, लोणची विक्रीसाठी उपलब्ध असतील. धातू काम, लाकडावरील कोरीव काम आणि चामड्याची विविध उत्पादने हे या महोत्सवाचे आकर्षण ठरेल.

श्रावण मेळयाची रंजकता वाढविण्यासाठी महोत्सवाच्या कालावधीत दर **शनिवारी** आणि **रविवारी सायंकाळी 07.00** नंतर सांस्कृतिक कार्यक्रम नियोजित आहेत.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी, सिडको**